रविवार
२.२.२०२५
वर्षे : ४ अंक : २९६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955



## मोदी सरकार ०३ चा

### आयकरासंदर्भात अर्थमंत्र्यांची मोठी घोषणा,१२ लाखांपर्यंत आयकर नाही

# अर्थसंकल्प सादर

नवी दिल्ली (वृत्तसेवा):–अर्थमंत्री निर्माला सीतारमण यांनी मोदी सरकार ०३ चा अर्थसंकल्प शनिवारी सादर केला. या अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीय आणि नोकरदारांच्या अनेक अपेक्षा होत्या. या अर्थसंकल्पातून आयकरात किती सुट मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु आजच्या अर्थसंकल्पातून अर्थमंत्र्यांनी काही दिले नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, नवीन कर विधेयक पुढील आठवड्यात सभागृहात मांडले जाईल. नवीन कायदा आयकर कायदा, १९६१ ची जागा घेईल. आता नवीन करप्रणालीत १२ लाखापर्यंत आयकर लागणार नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, पुढील आठवड्यात नवीन आयकर विधेयक येईल. आयकरावर नवा कायदा करण्यात येणार आहे. त्यात आयकर नियमांमध्ये मोठा बदल होणार आहे. मात्र, याचा टॅक्स स्लॅबशी काहीही संबंध नाही. टीडीएसची प्रक्रिया अधिक सुलभ केली जाईल, असे अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले. ज्येष्ठ नागरिकांसाठी कर सवलत दुप्पट केली आहे. त्यांच्यासाठी व्याजावरील सवलत ५० हजार रुपयांवरून १ लाख रुपये करण्यात येत आहे. टीडीएस–टीसीएस कमी होणार आहे. २०२० च्या अर्थसंकल्पात जेव्हा सरकारने नवीन कर प्रणाली लागू केली, तेव्हा लोक ती स्वीकारण्यास तयार नव्हते, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी म्हटले होते. त्यांनी सांगितले की, आयकर दात्यांना जुन्या कर प्रणाली नवीन कर प्रणालीपेक्षा चांगली आणि अधिक फायदेशीर वाटत होती. पण आता देशातील ६५ टक्क्यांहून अधिक करदात्यांनी नवीन कर प्रणाली ▶▶पान २ वर



### किती बदलला टॅक्स

० ते १२ लाखांपर्यंत – काहीच कर नाही, १२ ते १६ लाखांपर्यंत – १५ टक्के आयकर लागणार, १६ ते २० लाखांपर्यंत २० टक्के आयकर लागणार, २० ते २४ लाखांपर्यंत २५ टक्के आयकर लागणार, २४ लाखांपेक्षा जास्त ३० टक्के आयकर लागणार

### बदलानंतर नवीन कर व्यवस्था अशी होती

०–३ लाख: शून्य, ३–७ लाख: ५% , ७–१० लाख: १०%, १०–१२ लाख: १५%, १२–१५ लाख: २०%, १५ लाखाच्या वर: ३०%

### जुनी कर व्यवस्था

० ते २.५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर: ०%, २.५ लाख ते ५ लाख रुपये उत्पन्नावर: ५%, ५ लाख ते १० लाख रुपये उत्पन्न: २०%, १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्नावर: ३०%

### चंदनसावरगावजवळ दोन कारची समोरासमोर धडक

# तीन ठार, एक गंभीर जखमी





अंबाजोगाई, (प्रतिनिधी)ः–केज मार्गावरील चंदनसावरगाव नजीक शुक्रवारी रात्री १०.४५ च्या सुमारास दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी आहे. मृतांमध्ये अमित दिलीपराव कोमटवार (वय ३५, रा. दिंद्रुड, माजलगाव) यांचा समावेश आहे. अपघातातील कार क्रमांक (एम एच–२३/ई ६८५२) आणि (एम एच–१२/एम डब्ल्यू–३५६३) यातील वाहन चालकांचे नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात घडला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या अपघातात अमित कोमटवार आणि बीड येथील दोघांचा मृत्यू झाला तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला. अमित कोमटवार हे दिंद्रुडचे सरपंच अजय कोमटवार (पान २ वर)

### लिंबागणेश येथे चोरट्यांनी

# मेडिकल फोडले



**चोरटे सीसीटीव्हीत कैद**

लिंबागणेश, (प्रतिनिधी) :–बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक स्थित एकनाथ तागड यांच्या मालकीचे साधना मेडिकल अँड जनरल स्टोअर्स आज दि. ०१ शनिवार रोजी पहाटे ४ वाजता चोरट्यांनी फोडल्याचे आढळून आले. दुकानात असलेल्या सीसीटीव्हीत चोरटे कैद झाले असुन मेडिकल स्टोअर्स वरील मराठवाडा ग्रामीण बँक येथील सीसीटीव्ही कॅमेरे फोडण्यात आले आहेत. संबंधित प्रकरणी नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनि चंद्रकांत गोसावी यांना फोनवरून कल्पना दिली आहे. साधना मेडिकल स्टोअर्सचे मालक एकनाथ तागड यांच्या म्हणण्यानुसार ते रात्री २ वाजता ज्वारी गहु भिजण्यासाठी रानात गेले होते. सकाळी ६ वाजता त्यांना त्यांचे दुकान फोडले असल्याचा फोन आला. दुकानात येऊन सीसीटीव्हीत पाहिले असता पहाटे ४ वाजता ३ जण तोंडावर रूमाल बांधुन कटर,टांबी ईतर साहित्याच्या सहाय्याने शटरचे दोन्ही कुलुप तोडून आत शिरून गल्ल्यातील पैसे काढून घेत असल्याचे दिसत आहे. एकनाथ तागड यांच्या म्हणण्यानुसार गल्ल्यातील ५००० रूपये चोरट्यांनी लंपास केले. नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस नाईक राऊत, लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे. संतोष राऊत, नवनाथ मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

### बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

# प्रधानमंत्री आवास योजना

## ग्रामीणसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त



बीड, (प्रतिनिधी):– प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल ५०१८ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ३४९९ घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार ▶▶पान २ वर

### आर्थिक मागणी झाल्यास संपर्क करा

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर आर्थिक मागणी झाल्यास ९७६६२७२७२४,९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# शास्त्रींकडून धनंजय मुंडेंची पाठराखण



### पंकजा मुंडेंची प्रतिक्रिया,राजीनाम्यावरही भाष्य

जालना, (प्रतिनिधी) :– सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण, बीडमधील गुन्हेगारी आणि खंडणी प्रकरणावरुन राजकारण चांगलंच तापलं असून मंत्री धनंजय मुंडेंच्याराजीनाम्याची मागणी होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर वाढता दबाव लक्षात घेऊन धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन महंत नामदेव शास्त्रींची भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली. तर, या भेटीनंतर दुसऱ्याच दिवशी नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंच्या समर्थनार्थ पत्रकार परिषद घेऊन धनंजय गुन्हेगार नाही हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो असे त्यांनी म्हटले. तसेच, खून करणाऱ्या आरोपींच्या मानसिकतेचा विचार व्हावा, अशीही प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. त्यावरुन, सोशल मिडिया व राजकीय वर्तुळातून नामदेव शास्त्रींवर टीकेची झोड उठली. तसेच, काहींनी पंकजा मुंडेंना व धनंजय मुंडेंना वेगळा न्याय का, असा सवालही उपस्थित केला होता. आता, नामदेव शास्त्रींची भूमिका आणि धनंजय मुंडेंची पाठराखण यासंदर्भात पंकजा मुंडेंनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे. नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंची पाठराखण केली असून त्यांच्या समर्थनार्थ भक्कपणे पाठिशी असल्याचंही त्यांनी म्हटलं. यासंदर्भात पंकजा मुंडेंना जालन्यातील पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला होता, त्यावर त्यांनी अधिकचं बोलणं टाळलं. ''त्यांची त्यांची भूमिका आहे, त्यावर मी भूमिका व्यक्त करण्याची आवश्यकता वाटत नाही, असे पंकजा मुंडेंनी म्हटलं. तर, धनंजय देशमुख हे भगवान गडावर जाणार आहेत, यावरही त्यांनी प्रतिक्रिया देताना, प्रत्येक व्यक्तीच्या भूमिकेवर व्यक्त होण्याने फक्त बातमी होते, बाकी काही नाही, असे म्हणत पंकजा मुंडेंनी नामदेव शास्त्रींच्या वक्तव्यावर आणि धनंजय मुंडेंची पाठराखण करण्यावर ▶▶पान २ वर

# भगवानगडाची मदत नको,न्याय पाहिजे–धनंजय देशमुख



बीड, (प्रतिनिधी)ः–बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे सध्या राज्यातील वातावरण तापलं आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आंदोलन केले जात आहे. त्यातच भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना क्लीनचिट दिली आहे. धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया ट्रायल सुरू आहे असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री म्हणाले. यासोबतच संतोष देशमुखांच्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी भगवानगड उचलायला तयार आहे, असेही नामदेव शास्त्रींनी सांगितले. आता यावर संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय देशमुख यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना भगवान गड कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी उचलायला तयार आहे, याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भाष्य केले. आम्हाला भगवानगडाची मदत नको, न्याय पाहिजे, असे धनंजय देशमुख म्हणाले. या प्रकरणातील आरोपी फरार करण्यात ज्यांचा ज्यांचा संबंध आहे, त्यांना कुणी कुणी पैसे ▶▶पान २ वर




# प्रजासत्ताकाचा पायाच पोकळ!



अनास्थेची लागण प्रत्यक्ष एखाद्या साथीच्या रोगापेक्षाही भयानक असते. राज्यातील कथित प्रगत शहर पुणे सध्या याचा अनुभव घेते आहे. पुण्यामध्ये गुइलेन बॅरे सिंड्रोमनामक (जीबीएस) आजाराची लागण होण्याचे प्रमाण प्रचंड आहे. हा आजार नवीन नाही, पण त्याचे रुग्ण ज्या प्रमाणात वाढताहेत, ते मात्र घाबरवणारे आहे. हे प्रमाण कशामुळे वाढते, याच्या खोलात गेल्यावर जे दिसते, ते राजकीय हव्यासाचे आणि प्रशासकीय अनास्थेचे किळसवाणे रूप. अर्थात, हे पुण्यात झाले म्हणून किमान त्याची चर्चा तरी होते. तिकडे बुलढाण्यात एका गावात अचानक सुरू झालेल्या केसगळतीची नुकतीच घडलेली घटना आता कुणाच्या खिजगणतीत तरी आहे का, हा प्रश्नच. विदर्भाच्या वाट्याला आलेल्या अनास्थेचा अनुशेष काही भरून निघायला तयार नाही. पुण्यातील या 'जीबीएस'नामक आजाराची लागण होणे खरे तर नवीन नाही. दूषित पाणी वा अन्नामुळे पचनसंस्थेत बिघाड होऊन एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर शरीरात शिरलेल्या विषाणू व जिवाणूंशी मुकाबला करणारी शरीरातील रोगप्रतिकारशक्ती काही वेळा अनाकलनीयपणे इतकी प्रचंड वाढते, की शिरलेले विषाणू व जिवाणू मेल्यानंतर या वाढलेल्या प्रतिकारशक्तीला काय करायचे, हे उमजत नाही. ती मग शरीराच्या मज्जासंस्थेवर हल्ला करते. त्यामुळे स्नायूंवर आघात होऊन गिळण्यास वा श्वसनास प्रचंड अडथळे, हातापायातील त्राण जाणे, पक्षाघात असे विकार उद्भवतात. ही स्थिती गुदरलेल्या व्यक्तीला आधीच काही सहव्याधी असतील, तर तिची प्रकृती अधिक नाजूक होऊन ती व्यक्ती दगावूही शकते. ही लक्षणे असलेले रुग्ण यापूर्वीही होते. फक्त त्यांची संख्या कमी होती. गेल्या वर्षी पुण्यात वर्षभरात असे १८५ रुग्ण आढळले. यंदा त्याचे गांभीर्य अधिक नजरेत भरले, कारण जानेवारीच्या एकाच महिन्यात रुग्णसंख्या शंभराच्या जवळपास जाऊन ठेपली. पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील एका भागात ही संख्या वेगाने वाढली. बाधित भाग हा अगदी पूर्वीपासून महापालिका हद्दीतील नाही. काही वर्षांपूर्वी 'राजकीय' सोयीसाठी महापालिकेला जोडला गेला. या भागाचे वैशिष्ट्य असे, की तो महापालिकेला जोडण्यापूर्वीच येथे जमिनी विकून उंच इमारती बांधल्या गेल्या. त्या एकदा विकायच्या ठरल्या, की बांधकाम व्यावसायिकांना आणि त्या स्वस्तात आहेत म्हटल्यावर ग्राहकांना, 'या इमारतींना पाणीपुरवठा कसा केला जाणार, सांडपाणी कसे वाहून नेले जाणार,' असले प्रश्न पडतच नाहीत. इमारती उभ्या राहतात, लोक राहायला येतात आणि मग हे प्रश्न पडायला सुरुवात होते. त्याची तीव्रता वाढते, ती असे 'जीबीएस'सारख्या आजाराचे रुग्ण वाढू लागल्यावर. आता पुण्यातला जो भाग 'जीबीएस'ग्रस्त आहे, तो आहे खडकवासला धरणाजवळ. तेथून साऱ्या पुण्याला पाणीपुरवठा होतो. मात्र, या भागातील बहुतांश इमारती पाण्याची तहान भागविण्यासाठी अवलंबून आहेत टँकरवर! का? तर ही गावे महापालिकेला जोडल्यावर त्यांना आवश्यक असलेला अतिरिक्त पाणीकोटा राज्य सरकारने मंजूरच केलेला नाही म्हणून. परिणामी, महापालिका या भागांना मोफत टँकर पुरवते. पण, तेवढे पाणी पुरत नाही, त्यामुळे पैसे मोजून खासगी टँकर बोलावले जातात. टँकरवाल्यांची लॉबी कशा प्रकारे नाडते, हे राज्यातील प्रत्येकच शहर अनुभवते. कागदोपत्री टँकरना 'जीपीएस ट्रॅकर' वगैरे लावून त्यांच्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना आहेत. पण, प्रत्यक्षात या टँकरमध्ये नेमके कुठले पाणी भरले जाते, याची काहीच तपासणी होत नसल्याने त्या केवळ वदंताच ठरतात. थोडक्यात, या टँकरद्वारे दिलेले पाणी पिण्यास योग्य आहे वा अयोग्य, याचा काहीच मापदंड नाही. मध्यंतरी पुण्यातील अन्य एका भागातील सोसायटीत टँकरद्वारे चक्क अर्धवट पुनर्प्रक्रिया केलेले सांडपाणी रग्गड पैसे घेऊन विकले जात होते. रहिवाशांना त्रास व्हायला लागल्यावर हा प्रकार उघडकीस आला आणि कारवाई झाली. 'जीबीएस'ग्रस्त खडकवासल्याजवळील भागात हे होत नसेल, असे ठामपणे सांगता येत नाही. शिवाय या भागात एक पूर्वापार विहीर आहे, ज्यात धरणातील पाणी जलवाहिनीद्वारे आणून साठवले जाते, जे पंपांद्वारे उचलून नागरिकांकडून वापरले जाते. अनेकदा टँकरच्या बेभरवशी कारभारावर अवलंबून राहण्यापेक्षा पूर्वीचे ग्रामस्थ हेच पाणी पिण्यास वापरतात. हे योग्य प्रकारे शुद्धीकरण केलेले पाणी नाही, त्यात सांडपाणी मिसळण्याचा धोका आहे, कारण सांडपाण्यासाठीच्या वाहिन्यांची व्यवस्था कशी केली, हे प्रशासनालाच माहीत नाही. आता महापालिकेत समावेश होऊनही गावांना शहरातील इतर भागांसारखा बंद नळातून शुद्ध पाणीपुरवठा का नाही, तर जलशुद्धीकरण केंद्रासाठी पुणे महापालिकेने मागितलेली जागा जलसंपदा विभागाबरोबरच्या वादामुळे महापालिकेला अद्याप मिळालेलीच नाही. तो वाद सोडविण्याची राजकीय इच्छाशक्ती अजून कोणी दाखवलेली नाही आणि त्यामुळे या समाविष्ट गावांसाठीच्या पाणीपुरवठा योजना केवळ कागदावर तयार आहेत. 'जीबीएस'चे निदान, उपचार यावर आता भर दिला जातो आहे, महापालिका, राज्य सरकार उपचारांसाठी होणाऱ्या खर्चाचा भार उचलणार आहेत, वगैरे नंतरचे उपाय. ही पश्चातबुद्धीच. तरी, ते करणेही गरजेचेच, कारण या आजाराची तीव्रता एवढी आहे, की व्याधिग्रस्त रुग्णाचा खर्च चाचणी आणि उपचारांसह काही लाखांत जातो आहे. तेव्हा, रुग्णांच्या चाचण्या, निदान व उपचारांवर भर हवाच. त्यासाठी आपण कसा पुढाकार घेतला वगैरे शेखी मिरविण्याची अहमहमिका राजकीय नेत्यांमध्ये लागलीच आहे, शिवाय आरोग्यविषयक काय काळजी घ्यावी, याचे उपाय सुचवून आणि जीबीएसग्रस्त भागातील 'त्या' विहिरीच्या शुद्धीकरणासाठी प्रयत्न सुरू करून प्रशासनही आता आपण कशी पावले उचलली, हे दाखवत आहे. बाहेरचे अन्न, पाणी ग्रहण करू नका, असे प्रशासनाने सांगितले आहे. मात्र, ज्यांचा दिवसच गाडीवरचा एखादा वडापाव खाऊन आणि तेथील पिंपात साठवलेले पाणी पिऊन जातो, त्यांनी काय करायचे हे प्रशासन सांगत नाही! या सगळ्यात मूळ प्रश्न बाजूला राहिले आहेत, त्यांची उत्तरे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघेही देत नाहीत, कारण ते प्रश्न केवळ पुण्याला नाही, तर मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक आणि राज्यातील अन्य मोठ्या शहरांनाही लागू आहेत. राजकीय सोयीसाठी शहरांचा विस्तार करताना, विस्तार होणाऱ्या भागांत महापालिकेच्या बांधकाम शुल्काची झंझट नको, म्हणून महापालिका समावेशाआधीच राजकीय आशीर्वादाने हवी तशी बांधकामे करून घ्यायची आणि मग त्यांचा महापालिका हद्दीत समावेश होऊन मूलभूत सुविधा पुरवायची वेळ आली, की महापालिकांनी निधी नाही म्हणून हात वर करायचे. महापालिकांचा मुख्य उत्पन्नस्रोत असलेला मिळकतकर या अशा समाविष्ट गावांतून गोळा करणेही दुष्कर, ज्याची कारणे पुन्हा राजकीयच आहेत. शिवाय, निवडणुकांत फटका नको, म्हणून आधीपासून महापालिकेत असलेल्या मिळकतींचा कर न वाढविण्याची 'कृपा' मतदारांवर करावी लागते. त्यातून या कराचे मोठमोठे थकबाकीदार फक्त सवलती घेऊन 'अभय' मिळवत राहत असल्याने महापालिका कफल्लक होत राहते. मग कसे मिळणार नागरिकांना चांगले रस्ते आणि शुद्ध पाणी? 'जीबीएस' आजारात अनाकलनीय कारणाने वाढणारी रोगप्रतिकारशक्तीच शरीरातील धडधाकट भागांवर हल्ला करते. ज्यांनी सामान्य माणसाचे जगणे सुसह्य करायचे, ते लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यापेक्षा वेगळे काय करताहेत? एका बाजूला मंगलयान, चंद्रयानची सुखद भाषा आणि दुसरीकडे किमान शुद्ध पिण्याचे पाणीही देता न येणारी आपली व्यवस्था. आपण नुकताच आपला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला. पण त्या प्रजासत्ताकाचा पायाच इतका पोकळ राहणार असेल तर अशा वेळी जगातली तिसऱ्या, चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊन आपण नक्की साधणार काय?

# डॉक्टर बनण्याचं स्वप्न पूर्ण होणार

# एमबीबीएस इतक्या जागा वाढणार

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी केंद्राचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात मेडिकलच्या सिट वाढण्यासाठी तरतूद केली आहे. त्यामुळे मेडिकलचे शिक्षण घेऊन डॉक्टर बनणाऱ्यांचे स्वप्न साकार होणार आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीच्या दहा हजार नवीन जागा साल २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात वाढविण्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी केलेली आहे. येत्या पाच वर्षांत मेडिकलच्या नवीन जागांची संख्या वाढून ७५ हजार करण्याची घोषणा सरकारने केली आहे. सरकारच्या या निर्णयाने वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर्सची संख्या वाढून नागरिकांचा योग्य वैद्यकीय सुविधा मिळणे शक्य होणार आहे. देशभरातील एमबीबीएस डॉक्टर बनण्यासाठी १२ ते १३ लाख स्टुडन्टस नीट युजीची परीक्षा दिली जाते. यात केवळ ५६ हजार स्टुडन्टस



सरकारी मेडिकल कॉलेजचे असतात. यातील बहुतांश विद्यार्थ्यांना खाजगी कॉलेजात प्रवेश करावा लागतो. बहुतांश विद्यार्थ्यांना खाजगी कॉलेजात प्रवेश घ्यावा लागत आहे. त्यामुळे त्यांना मोठी कॅपिटेशन फी भरुन प्रवेश घ्यावे लागतात. अशा विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या अर्थसंकल्प- २०२५ मध्ये दहा हजार नवीन जागा वाढविल्या आहेत. सरकार पुढील पाच वर्षात या वैद्यकीय जागांची संख्या ७५ हजार करणार आहे. अर्थसंकल्प -२०२५ च्या अर्थसंकल्पातील भाषणात अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात दहा हजार नवीन जागांची घोषणा केली आहे. सरकाने आरोग्य क्षेत्राला चांगल्या सुविधा देण्यासाठी टीयर-२ शहरात आरोग्यांच्या सुविधा वाढविण्यासाठी एमबीबीएसच्या जागा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या दहा वर्षांत वैद्यकीय महाविद्यालये आणि मेडिकलच्या जागा वेगाने वाढत आहेत. यंदा केंद्र सरकारचे १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी सांगितले की केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये ६० नवीन मेडिकल कॉलेज सुरु करण्यास मंजूरी दिलेली आहे. याच बरोबर एकूण ७६६ मेडिकल कॉलेज देशात सध्या सुरु आहेत. वैद्यकीय कॉलेजात ८.०७ टक्के वाढ झाली आहे. म्हणजे गेल्या दहा वर्षात मेडिकल कॉलेज आणि जागांमध्ये दुप्पटवाढ झाली आहे.

## दोन्ही शिवसेना एकत्र येणार?

मुंबई, (वृत्तसेवा):-शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दोन्ही शिवसेना एकत्र आल्या पाहिजे, असं विधान केलं आहे. त्यामुळे दोन्ही शिवसेना एकत्र येणार का? एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरेंशी हातमिळवणी करणार का? अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. त्यावर आता ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी मोठं विधान केलं आहे. शिरसाट यांनी पक्षातून जाण्याआधीच हा विचार का केला नाही? असा सवाल चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. चंद्रकांत खैरे यांनी मीडियाशी संवाद साधताना ही प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे यांना भाजपने वेगळं पाडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्या भीतीपोटीच संजय शिरसाट यांनी दोन्ही शिवसेना एकत्र आल्या पाहिजेत अशी गुगली टाकली आहे. दोन्ही शिवसेना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असं शिरसाट म्हणत असतील तर त्यांनी हा विचार आधीच का केला नाही? असा सवाल चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. पक्षातून फुटण्याआधी उद्धव ठाकरे यांच्याशी मनमोकळेपणाने बोलले असते तर त्यांनी ऐकलं असतं.

# धनंजय मुंडे आधुनिक तुकाराम महाराज होऊ शकतात

## जितेंद्र आव्हाड यांची खोचक टीका

मुंबई, (वृत्तसेवा):-मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांनी नैतिकदृष्ट्या राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे. त्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंडे यांची पाठराखण करीत त्यांना राजीनामा देण्याची काही आवश्यकता नाही असे म्हटले आहे. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना प्रमाणपत्र दिले आहे. तसेच या प्रकरणात ज्यांनी संतोष देशमुख यांचा हत्या केली त्यांची मानसिक अवस्था देखील पाहावी अशी मागणी देखील नामदेव शास्त्री महाराज यांनी केली आहे. त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी आपली भूमिका मांडली आहे. मंत्री धनंजय मुंडे गेले दीड दोन महिन्यांपासून संतोष देखमुख यांची हत्या झाल्यानंतर चर्चेत आहेत. त्यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड याना अटक झाली आहे. या प्रकरणातील सर्व सहा आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे. या प्रकरणात आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांना फेटाळून लावत त्यांची बाजू घेतली आहे. मुंडे यांची ज्या प्रकारे मीडिया ट्रायल सुरु आहे, आणि ज्या प्रकारे त्यांनी संयमीपणा दाखविला आहे. तो पाहाता इतका संयमीपणा जर अध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी दाखविला असता तर ते संत पदावर पोहचले असते अशा आशयाचे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी केले आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी आपण संत नामदेव शास्त्री महाराजांबद्दल बोलण्याइतके मोठे नाही परंतू ते ज्या गादीचा वारसा चालवित आहेत, तिला थोर परंपरा आहे. त्याचा तरी त्यांना मान राखावा अशी अपेक्षा आहे. त्महंत म्हणतात की पंकजा मुंडे माझ्याकडे आल्या नव्हत्या म्हणून मी त्यांची बाजू घेतली नाही. कराड हा आरोपी आहे. तर धनंजय मुंडे हे मंत्री असल्याने आपण त्यांची बाजू घेतली असे त्यांचे म्हणणे आहे. संतांनी शेवटच्या माणसाचे ऐकले पाहीजे. मूळात ते ज्या गादीचा वारसा चालवित आहेत तिला मोठी परंपरा आहे. भगवान गडची जागा एका कासार समाजातील व्यक्तीची आहे. त्यानंतर भीमसेन महाराज आले, ते राजपूत समाजाचे होते. ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी होते. बाबासाहेबांच्या मनमाड परिषदेत संत भीमसेन गुरुजी सामील झाले होते. त्यांना कुणाला त्या जागेवर बसवायच होतं आणि तिथे कोण मोटार सायकलवर येऊन बसलं हे सगळ्याना माहिती आहे. संत तुकाराम यांची कधी जात चर्चेत आली नाही. त्यांना अख्या महाराष्ट्राने संत पदी नेले होते. या गादीचा मान राखायला हवा. आता धनंजय मुंडे आधुनिक तुकाराम महाराज होऊ शकतात असेही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

पान १ वरुन

### मोदी सरकार...

स्वीकारली आहे. म्हणजेच प्रत्येक ३ पैकी २ लोक नवीन कर प्रणाली अंतर्गत आयकर भरत आहेत. गेल्या एका वर्षात या डेटामध्ये बरेच बदल झाले आहेत.

### प्रधानमंत्री आवास योजना...

तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

### चंदनसावरगावजवळ...

यांचे ज्येष्ठ बंधू होत. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.ङ्गङ्गयुसुफवडगाव पोलीस ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांना माहिती मिळताच, त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार शेंडगे, हेडकॉन्स्टेबल पठाण, हेडकॉन्स्टेबल वारे घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. जखमी व्यक्तीला पुढील उपचारासाठी लातूर येथे हलवण्यात आले असल्याचे समजते.

### शास्त्रींकडून धनंजय...

बोलणे टाळल्याचे दिसून आले. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः विषय अजून तसा धनंजयकडे केला नाही. त्यामुळे मला कळत नाही, कुठे दबाव आहे. स्वतः अजित पवारांनी स्पष्ट सांगितलेलं आहे, त्यात संबंध आढळला तर आम्ही योग्य ती कारवाई करू. पण, संबंध नसेल तर अन्याय व्हायला नको, हा अजित दादांचा निर्णय आहे, असे म्हणत पंकजा मुंडेंनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीवरही स्पष्टपणे भाष्य केलं. मनसेचे प्रकाश महाजन यांनी दिवंगत नेते गोपीनाथ मुंडेंचा संदर्भ देत धनंजय मुंडेंवर टीका केली होती. त्यासंदर्भात पंकजा मुंडेंना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, त्यांचे ते व्यक्त होतात, मी त्यांच्यावर कधी व्यक्त होत नाही, ते स्वतंत्र व्यक्तिमत्व आहेत, तसेच ते दुसऱ्या पक्षाचे नेते आहेत, असे म्हणत पंकजा मुंडेंनी प्रकाश महाजन यांच्या वक्तव्यावर अधिकचं बोलणं टाळलं.

### भगवानगडाची मदत नको...

पान १ वरुन

पाठवले. या सर्व गुन्हेगारीला बळ देणाऱ्या ज्या कुणी व्यक्ती आहेत त्यांचे नावे घोषित करावेत. गुन्हेगारांना फरार करताना मदत केली. अशा व्यक्तींचीही नावे घोषित करावीत. फेसबुक पोस्टच्या कमेंटमध्ये धमकी येतात त्या संदर्भात पोलीस अधीक्षक यांना काल पुरावे दिलेले आहेत. त्यात एक दोन दिवसांमध्ये कारवाई होईल. गेल्या ५३ दिवसांपासून तपास योग्य दिशेने होत आहे. त्याचा रिझल्ट असा आला पाहिजे की आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. आमचे हीच मागणी आहे की आम्हाला यात न्याय मिळायला पाहिजे, असे धनंजय देशमुख म्हणाले. आरोपींना एक चापट मारली. एवढ्या पुरतच नामदेव महाराज शास्त्री यांना सांगितले आहे. शिष्टमंडळ आणि गावकरी आम्ही सगळे भगवान गडावर जाणार आहोत. गेल्या २८ मे पासून आतापर्यंत काय काय घडलं, खंडणी कशाप्रकारे मागितली, खून कसा झाला, संतोष देशमुख यांच्यावर कुठले गुन्हे आहेत का, हे पण आम्ही त्यांना दाखवणार आहोत आणि आम्ही त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर घेणार आहोत, असेही धनंजय देशमुखांनी म्हटले. संतोष देशमुख कुटुंबावर काय आघात झालेले आहेत या ५३ दिवसांमध्ये सगळ्या राज्यभरातून संप्रदाय सामाजिक क्षेत्रातील सगळे लोक इथे आलेले आहेत. ते प्रत्यक्ष संतोष अण्णा देशमुख यांचं गाव, त्यांचं काम यावर प्रतिक्रिया दिली आहे. मरताना तो माझ्या कुटुंबासाठी मला जिवंत ठेवा असं न बोलता माझ्या गावासाठी जिवंत ठेवा असं बोलला. यातून त्याला त्याचं गाव किती महत्त्वाचं होतं, त्यात ही भावना महत्त्वाची आहे. गेल्या ५३ दिवसात ज्यांनी कोणी बघितले नाही, त्यांना हे समजणं शक्य नाही. जे कुणी इथे आले त्यांना घाव समजलेला आहे. त्यामुळे नामदेव शास्त्री यांना हे सगळं समजल्यावर आरोपी आणि संतोष अण्णाविषयी त्यांचे काय उत्तर येते, हे बघणं आमची जबाबदारी आहे, असे धनंजय देशमुख म्हणाले.

* मदतीची गरज माझ्या गावांनी पूर्ण केली : एक थेंब रक्त सांगितले की त्यांना वाईट वाटलं. पण संतोष देशमुख यांचे कृकत्यांनी हाल केले, त्यांच्या गाडीवर फोटो कोणाचे होते, ज्या ऑफिसमध्ये बसायचे तिथे कुणाचे फोटो होते, हे सगळा क्रम ही सगळी गोष्ट आम्ही नामदेव शास्त्री महाराजांना दाखवणार आहोत. त्यानंतर त्यांची प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. गेल्या ५३ दिवसांपासून आमच्या कुटुंबाच्या शैक्षणिक सामाजिक या सर्व गरजा राजकीय/सांप्रदायिक,सामाजिक यांनी ह्या गोष्टी उचल्ल्या आहेत. त्यामुळे आता आम्हाला ती गरज नाही. न्यायाची गरज आहे. मदतीची गरज माझ्या गावांनी आणि इतरांनी पूर्ण केलेली आहे, असेही धनंजय देशमुखांनी ठणकावून सांगितले.

# केंद्र सरकारची पीएम धन धान्य कृषी योजना

नवी दिल्ली, (वृत्तसेवा) :- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन (छळीरश्रर डळींहरीरारप) यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सविधा यांच्या विकासासाठी सरकारनं भरीव तरतूद केलीय. पण यावेळी केंद्रानं शेती क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिल्याचं दिसतंय. सरकारं या अर्थसंकल्पात पीएम कृषी धन धान्य योजनेची घोषणा केलीय. याच पार्श्वभूमीवर ही योजना नेमकी काय आहे? या योजनेमुळे शेतकऱ्यांना नेमका काय फायदा होणार आहे? सोबतच योजनेत नेमकं काय केलं जाणार? हे जाणून घेऊ या...निर्मला सीतारामन यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर केला. यावेळी सीतारामन यांनी शेतकऱ्यांना अनेक मोठे गिफ्ट दिलेत. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून आता ५ लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. सोबतच पंतप्रधान धन धान्य कृषी योजनेचीही घोषणा करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित केलं जाईल. पिकाची साठवणूक तसेच सिंचन व्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाईल. सोबतच उच्च गुणवत्ता असलेले बी-बियाणे शेतकऱ्यांना पुरवले जातील. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी खतांचा पुरवठा केला जाईल. सोबतच या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, कृषी पंप आदी उपकरणं घेण्यासाठीही अर्थसहाय्य केले जाईल. याच योजनेअंतर्गत महिला शेतकऱ्यांना या क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. ग्रामीण क्षेत्रात रोजगाराची संधी कशी वाढेल, याकडे लक्ष दिले जाईल. यामुळेच आगामी काळात शेती क्षेत्रात बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com